REVIEW OF LITERATURE


ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 2.0260(UIF)
VOLUME - 4 | ISSUE - 7 | FEBRUARY - 2017

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौध्द धर्म

डॉ. माने ए. एस.
इतिहास विभाग प्रमुख
श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि. सोलापूर.

## प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बडील अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी बाबासाहेबांना अत्यंत धार्मिक शिस्त लाबली होती. ते चौंथीची परीक्षा पास झाले त्यावेळी त्यांच्या समाजबांधवांनी बाबासाहेबांचा कौतुकास्पद सत्कार समारंभ ठेवला परंतु रामजींनी त्या सर्वांना नकार दिला. दादासाहेब केळुसकरांनी समजूत काढल्यानंतर ते तयार झाले. दादासाहेब केळुसकरांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. त्यावेळी त्यांनी डॉ.बाबासाहेब



आंबेडकरांच्या सत्कार समारंभात त्यांनी स्वतः लिहलेले बोद्ध चरित्रावरचे पुस्तक बाबासाहेबांना दिले. हे बक्षीस बाबासाहेबांच्या जीवनातील अमूल्य, अतुल्य असे बक्षीस ठरले. हे पुस्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मन लावून वाचले. त्यांच्या जीबनात अत्यंत प्रभावशाली हे पुस्तक ठरले.

## उद्दिष्टेः

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची बौध्द धर्माविषयी जिज्ञासा जाणून घेणे.
2. बोद्धधर्माची आचार तत्त्वे समजावून घेणे.
3. बौंद्धधर्म, मानवधर्म संकल्पना स्पष्ट करणे.

## १) बाबासाहेबांचा धर्मविषयक अभ्यास

बौद्ध धर्माचा वाडमयाचा संपूर्ण अभ्यास ते परदेशी शिकत असतानाच त्यांनी केला. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की, बोद्ध धर्म हाच खरा मानव धर्म आहे. तो कोणतीही कर्मकांडे, जातिभेद, स्पृश्य-अस्पृश्यबद्दलचा भेदभाव मानत नाही. त्यामुळे बोद्ध धर्म हाच मानवाच्या उद्धाराला योग्य धर्म आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत झाले.

जेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडला अभ्यासासाठी गेले तेव्हा त्यांनी अहोरात्र अस्पृश्य समाजासाठी झगडत २१ तास अभ्यास केला आणि हिंदू धर्म व बौध्द धर्म यातील फरक समजून घेतले त्यांनी हिंदू धर्माची रचना कशाप्रकारे आहे. यासर्वबाचा अभ्यास केला. हिंदू धर्मामध्ये सर्वश्रेष्ठ ब्राह्मण त्यानंतर क्षत्रिय मग वैश्य आणि सर्वात नित्कृष्टदर्जाचे म्हणजे

**शूद्र म्हणजेच अस्पृश्य. इतर समाजाकडून त्यांना कोणत्या प्रकारची वागणूक दिली जात होती याबद्दल त्यांना अत्यंत दुःख वाटत होते. इतर धर्मायांप्रमाणे हिंदू धर्मामध्ये चार वर्ण होते. या वर्णभेदाबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यास केला. हिंदू धर्माप्रमाणे त्यांनी बोद्ध धर्माचा सुद्धा अभ्यास केला त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मामध्ये कर्मकांड, मूर्तिपूजा, वर्णभेद या सर्वांपेक्षा मानवता या मूल्यास अत्यंत अनन्यसाधारण महत्त्व आहे. बोद्ध धर्मामध्ये फक्त मानवजातीचे कल्याण कशाप्रकारे करावे या तत्त्वावर संपूर्ण विवेचन केलेले आहे.**

## २) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबरील गोतम बुद्धांच्या तत्त्वांचा प्रभाव

बुद्धमार्गाची व्याख्या गोतम बुद्धांनी शिष्यांना सांगितली, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकनुकंपाय, हिताय सुखायं, देवमनुस्सानम्, आदिकल्याणम्, अंतिकल्याणम् बुद्धधर्म हाच बहुजन लोकांच्या हिताकरिता, सुखाकरिता, त्यांच्यावर प्रेम करण्याकरिता आहे. हा धर्म नुसत्या माणसांनीच स्वीकारून चालणार नाही तर तो संपूर्ण सृष्टीनेच स्वीकारला पाहिजे. ज्याप्रमाणे ऊस हा मुळातही मधुर असतो, मध्येही गोड असतो, शेंड्याकडेही गोडच असतो. त्याचप्रमाणे बुद्धधर्म सुख्वातीलाही मानवजातीच्या कल्याणासाठीच आहे, मध्येही कल्याणच आहे व पोषकच आहे. डतर धर्मामध्ये आत्मा काय, तो कोठे बसला आहे, देव कोठे आहे यासर्वांना समानता आढळून येईल. बुद्ध धर्मात देव, आत्मा यांचा विचार न करता माणसाने मानसाशी कशाप्रकारे वागले पाहिजे याचा विचार केलेला आढळतो. या धर्मात नीतीचे संबंध सांगितले आहेत. हा सधर्म आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, "भगवान बुद्धांचा अंत होऊन २५००0 वर्षे लोटली पण अजूनही हा धर्म जोमाने फोफावला आहे. याला कुणी शास्ता नाही की सर्वाधिकारी नाही.' अंतकाळी भगवताला त्याच्या शिष्याने विचारले, भगवंता, तुम्ही मेल्यानंतर तुमच्या पश्चात या धर्माचे काय होणार? याला कुणीतरी शास्ता देणार तेव्हा भगवंतांनी उत्तर दिले की, 'माझ्या गेरहजेरीत धर्म हाच तुमचा शास्ता आहे, तो जर तुम्ही पाळीत नसाल तर त्याचा काय उपयोग.' भगवान गोतम बुद्धांना या मानव जातीच्या कल्याणाकरिताच त्यांनी आपल्या संपूर्ण राज्यकारभाराचा म्हणजे एका राजाचे शुद्धोधन राजाचे राजपुत्र सिद्धार्थ होते. त्यांना दुःख म्हणजेच काही माहीत नव्हते. त्यामुळे एका नदीच्या पिण्याच्या पाण्यावरून त्यांनी संपूर्ण बेभवाचे आपल्या मुलाचे राहुलचे आणि आईचे यशोदाचे म्हणजेचत्यांची पत्नी या सर्वासह त्यांनी गृहत्याग केला. त्यांनी सात वर्षे गया येथे आत्मज्ञान प्राप्तीसाठी ते ध्यानस्थ बसले. त्यामुळे त्यांनी गया येथे पिंपळाच्या वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती केली. त्यामुळे त्या वृक्षाला बोधीवृक्ष म्हणतात. भगवान बुद्धांना सुरूवातीला पाच शिष्य मिळाले. त्यानंतर बुद्धधर्माचा प्रचार सर्वत्र होऊ लागला.

बुद्धांची शिकवण आहिसा करू नका, चोरी करू नये त्याप्रमाणे पशुहत्या या सर्वांबद्दल बुद्ध शिकवणीचे उदाहरण म्हणजे सम्राट अशोक यांनी कलिंगच्या युद्धानंतर त्याला रक्तपात पाहिल्यामुळे त्याचे मन अस्वस्थ झाले. त्याच्या मनाची घालमेल झाली तेव्हा त्याने बुद्ध धर्माचा स्वीकार केला व सर्व मानवजातीचे कल्याण बुद्ध धर्म आहे. जगाला युद्ध-क्रांती नकोय तर बुद्धांची शांती हवी अशी शिकवण बुद्ध धर्मामध्ये सांगण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्माचा अभ्यास करून आपल्या अस्पृश्य समाजावरील अन्याय थांबविण्यासाठी हिंदू धर्म तारू शकत नाही तर हा हिंदू धर्म अस्पृश्यांच्या जिवावर उठलेला आहे. त्यामुळे त्यांनी नाशिक येथील येवले येथे मुक्कामाला असताना १९३५ मध्ये १३ आक्टोबर रोजी धर्मांतराची सिंहगर्जना केली. त्यावेळी बाबासाहेबांना इतर धर्मीयांनी सोने, नाणी, वेभव, नावलोकिक इत्यादीच आमिष दाखवून आपल्या धर्माकडे येण्यासाठी आकर्षित केले. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांना बळी न पडता, नाग नदीकाठी वसलेले नाग लोकांचे शहर म्हणजे नागपूर या ठिकाणी त्यांनी आपली दुसरी पत्नी शारदा कुबेर ऊर्फ मार्डसाहेब सावंत तसे आपले ५ लाख सहकाऱ्यांसोबत त्यांनी भिक्षू चंद्रमणी महास्थवीर यांचेकडून ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमीत बौध्द धर्माची दीक्षा घेतली. त्रिशरण, पंचशील हे सर्व बोद्ध धर्माची तत्त्वे आत्मसात केली आणि बुद्ध धर्म हा सर्वश्रेठ्ठ धर्म आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. त्यावर त्यांनी तथागत भगवान गोतम बुद्ध आणि त्यांचा धम्म हे पुस्तक लिहले आहे. बाबासाहेबांनी बौध्द धर्मावर जो काही अभ्यास केला त्यामध्ये त्यांना गोतम बुद्धांना सर्व प्रथम गया येथील बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली. त्यानंतर धर्मप्रसारासाठी ते निघाले तेव्हा त्यांना पाच शिष्य मिळाले. त्यांना पंचवर्गीय भिक्षू असे म्हणतात. एकंदर ४0 शिष्य झाल्यानंतर बुद्धांना बाटले की आपण शिष्यांना अनुज्ञा करावी व धर्मप्रचारासाठी दूरदूर पाठवावे. त्यावेळी बुद्धधर्माची व्याख्या गोंतम बुद्धांनी शिष्यास सांगितली, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकनुकंपाय, हिताय सुखायं, देवमनुस्सानम्, आदिकल्याणम्, अंतिकल्याणम् बुद्धधर्म हा लोककल्याण्याकरीता बहुजन सुखाकरिता, त्यांच्यावर प्रेम करण्याकरिता हा धर्म आहे. धर्म नुसत्या माणसांनीच नाही तर तो संपूर्ण सृष्टीनेच स्वीकारला पाहिजे. ज्याप्रमाणे ऊस हा मुळातही गोड; मध्येही गोड असतो, शेंड्याकडे गोडच असतो. त्याचप्रमाणे बुद्धधर्मामध्ये सुरुवातीला कल्याण, मध्येही कल्याण व शेवटीही कल्याणच आहे. हाधर्म प्रत्येक मनुष्यप्राण्याला समान लेखतो. तो असा नाही की, हिंदू धर्मात ब्राह्मण आणि क्षत्रियच फक्त श्रेष्ठ बाकीच्या लोकांना दुय्यम ब हिंसक वागणूक दिली जाते. त्याचप्रमाणे बोद्ध धर्मामध्ये भेदभाव नाही. बुद्ध धर्मामध्ये देव, आत्मा या गोष्टींचा मुळीच विचार केला जात नाही. त्यामध्ये फक्त माणसाने माणसानी कशाप्रकारे वागले पाहिजे याचा विचार केलेला आढळतो. या धर्मात नीतीचे संबंध सांगितले आहेत. हा सधर्म आहे. बाकीचे धर्म झुट आहेत. ब्राह्मण आणि पुजाज्यांनी हा हिंदू धर्म बनविला आहे. बुद्धधर्मात मोक्ष मिळवून देण्यासाठी ख्रिश्चन लोकासारखे पाद्री नाहीत ब आत्म्यास सद्गती देणारे, पूजाविधी व यज्ञयाज करणारे ब्राह्मण तर मुळीच नाहीत.

जो धर्म फक्त मानव जातीच्या कल्याणाकरिता बनला आहे. तो फक्त नि फक्त बुद्ध धर्मच आहे. भगवान बुद्धांचा अंत होऊन २५०० वर्षे लोटली. जो धर्म अजूनही फोफावत आहे. याला कुणी शास्ता नाही की सर्वाधिकारी नाही. गोंतम बुद्धांच्या शिष्यांनी त्यांना विचारले, भगवंता, तुम्ही मेल्यानंतर तुमच्या धर्माचे काय होणार? याला कुणीतरी शास्ता ठेवा? यावर गोतम बुद्धांनी उत्तर दिले की, माझ्या गेरहजेरीत धर्म हाच तुमचा शास्ता असेल, विशुद्ध मनाने घेतलेला धर्म हाच तुमचा साक्षच अशी आहे भगवान बुद्धांची शिकवण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधर्माचा अत्यंत खोलवर अभ्यास केला. आणि त्यांनी अत्यंत तुलनात्मकदृष्ट्या हिंदू धर्मामधील जे काही खोटारडेपणा व बुद्ध धर्मच मानवजातीचे कल्याण करू शकतो. याचे सखोल ज्ञान त्यांनी मिळवले.

नाशिक येथील येवले मुक्कामी असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एक सिंहगर्जना केली. १९३५ साली त्यांनी सर्वासमवेत सांगितले, मी हिंदू म्हणून जन्मास आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही. अशी धर्मांतराची घोषणा बाबासाहेबांनी केली. त्यावेळची परिस्थिती, त्यावेळचे जे काही धर्म होते. त्यांनी बाबासाहेबांना काही आमिषे दाखवून आपल्या धर्मात येण्या [सटी संपत्ती, धन, प्रतिष्ठेची ग्वाही दिली. पण त्या सर्वांना न जुमानता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर येथील नाग लोकांच्यात बुद्ध धम्माची दोक्षा घेतली.

## निष्कर्ष:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू धर्मातील आत्म्याचे अस्तित्व नाकारले. शिवाय कर्मकांडात ब यज्ञयाग या ऐवजी जाणीव जगताना मध्यम मार्गाचा अवलंब करण्याचे अवाहन केले. तसेच समाजातील जातीप्रथा, अनिष्टप्रथा ब यांना विरोध केला. डॉ.बाबासाहेबांच्या व बौध्द धर्माच्या अभ्यासावरून असे दिसून येते की वर्णव्यवस्था, जन्मावर आधारीत नसून कर्मावर आधारीत आहे हे त्यांनी दाखवून दिले.

या तत्वाचा बोद्ध धर्माने केलेला प्रसार ब तत्कालीन सामाजिक परिस्थिती यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माचा प्रभाव अधिक असल्याचे आपणास दिसून येते. त्याची परिणीती पुढील काळात त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला.

## संदर्भ ग्रंथः


१. पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रतिभा प्रकाशन, पुणे-३०.१९९६.
२. साळुंखे आ.ह., हिंदू संस्कृती आणि खरी, आठवी आवृत्ती, मुंबई, २००८,
३. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, २00८,
४. नरके हरी व इतर (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२०0, मुंबई, २००५,